जा.क्र.वि.शा./निवडणूक/९८९६/२०१७
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा कार्यालय,पुणे
दिनांक :- २३/११/२०१७

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

**आदेश**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पत्र क्र. रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.२१/का-८ दि.१७/११/२०१७ च्या आदेशान्वये माहे जानेवारी-फेब्रुवारी-२०१८ या कालावधीत मुदती संपणा-या पुणे जिल्हयातील ९९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहीता दिनांक १७/११/२०१७ रोजी रात्रौ १२.०० वा. पासून ते निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील उत्तमनगर पोलीस स्टेशन मधील कुरण बुद्रूक ता. वेल्हे जि. पुणे या ग्रामपंचायतीची निवडणूक होणार असून, दिनांक २६/१२/२०१७ रोजी मतदान व दिनांक २७/१२/२०१७ रोजी मतमोजणी होणार आहे.

आणि ज्याअर्थी आचारसंहिता सुरु झालेपासून, मतमोजणी पुर्ण होईपर्यंत पुणे शहरात निवडणूक सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये खालील बाबींना निर्बंध घालण्याची आवश्यकता आहे. अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उत्तमनगर पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात दिनांक- २३/११/२०१७ रोजी रात्रौ ००.०१ वा पासून ते दिनांक २७/१२/२०१७ चे २४.०० वा पर्यंत खालील आदेश देत आहे.

१) निवडणूकीचे कालावधीत प्रचाराच्या अनुषंगाने कोणत्याही परिस्थितीत एकावेळी तीन पेक्षा अधिक वाहने एका ताफ्यात चालवू नयेत. तसेच दोन ताफ्यातील अंतर हे १५ मिनीटांचे असावे.

२) सदरचा आदेश संरक्षण वाहनांच्या ताफ्यासह केंद्र किंवा राज्य शासनाचे मंत्री किंवा उच्च पदस्थ व्यक्ती घेवून जात असेल तेव्हा त्यांच्या सुरक्षिततेविषयी लागू असलेल्या आदेशास अधिन राहून अंमलात राहिल व शासकीय कामावर असलेल्या वाहनांच्या संदर्भात लागू राहणार नाही.

सदर आदेशाचा उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहिल.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज रोजी २३/११/२०१७ रोजी दिला आहे.

**(रविंद्र कदम)**
**पोलीस सह आयुक्त,**
**पुणे शहर.**

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :- २३/११/२०१७**